माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ५०३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. लालेंद्र वामनजी कुंभलवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु उपविभाग, तुमसर, ता.तुमसर जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.मर्या. संवसु विभाग, भंडारा, ता.जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०९.२०२१ | २८.१०.२०२१ | ०१.१२.२०२१ | ०४.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १३.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " गोबरवाही विद्युत वितरण कार्यालयाअंतर्गत डीसी-१ व डी.सी.२ या गावातील गावनिहाय कमर्शिअल ग्राहक व घरगुती ग्राहक तसेच कृषीचे ग्राहक यांची आपल्या रेकॉर्डनुसार माहिती छायांकित करुन साक्षांकित प्रतीत देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०१.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र-अ नुसार अभिलेख्यावरील छायांकित माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती दिली " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०४.०१.२०२२ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग तुमसर यांनी उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्यास १० दिवसांच्या आत द्यावी, असे आदेश पारीत केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १८.०२.२०२२ रोजी** " अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक २४.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक २४.०४.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. लालेंद्र कुंभलवार यांनी दिनांक १३.०९.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र-अ नुसार गोबरवाही विद्युत वितरण कार्यालयाअंतर्गत डीसी-१ व डी.सी.२ या गावातील गावनिहाय कमर्शिअल ग्राहक व घरगुती ग्राहक तसेच कृषीचे ग्राहक यांची कार्यालयीन रेकॉर्डनुसार माहिती मागितली असता, त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वतीने दिनांक २८.१०.२०२१ रोजी माहे ऑगस्ट २०२१ व सप्टेंबर २०२१ ला लावण्यात आलेल्या नवीन घरगुती, व्यावसासिक व कृषी कनेक्शनची गावनिहाय यादी अपिलार्थीस प्रदान केली आहे. त्यावर अपिलार्थी यांनी दिनांक ०१.१२.२०२१ रोजी जोडपत्र-अ नुसार अभिलेख्यावरील छायांकित माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आक्षेप नोंदविला आहे. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०४.०१.२०२२ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, उपविभाग तुमसर यांनी उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्त्यास १० दिवसांच्या आत द्यावी, असे आदेश पारीत केले आहे. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार सदरची माहिती सही व शिक्का मारुन आपणास पुन्हा या पत्राव्दारे देण्यात येत आहे. तसेच गोबरवाही वितरण केंद्र-१ व गोबरवाही वितरण केंद्र-२ अशा दोन्ही वितरण केंद्राचा विचार करता घरगुती, कमर्शिअल व कृषी मिळून एकूण १४१७२ ग्राहक आहेत या सर्वांची यादी एकत्रितपणे कागदावर देणे सोयीस्कर नसल्यामुळे आपणास ही माहिती वा त्यातील मजकूर पाहिजे असल्यास आपण तसा लेखी अर्ज करुन आमचे उपविभागीय कार्यालयात स्वत: उपस्थित होऊन संगणकावर असलेल्या यादीचे आमचे कर्मचाऱ्यासोबत बसून अवलोकन करावे. आपणास पाहिजे असलेल्या नेमक्या माहितीची प्रिंटआऊट कर्मचाऱ्याकडून काढून घेवून आपणास प्रमाणित करुन देता येईल, असे अपिलार्थीस कळविले आहे.

आज सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांचे सविस्तर लेखी निवेदन आयोगास सादर केले आहे. त्यात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ नुसार विहीत मुदतीत त्यांच्या अर्जावर काय कार्यवाही केली याचे अवलोकन करावे याबाबत यांचे जबाब शपथपत्रावर घ्याव व अधिनियमानुसार यांनी चुक केली आहे हे सिध्द झाल्यास तात्काळ दंडात्मक कार्यवाही करावी व त्यांना नुकसान भरपाई रुपये १०,०००/- देण्यास प्राधिकरणास फर्मावून योग्य असा न्याय द्यावा, अशी विनंती केलेली आहे. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सादर केलेल्या लेखी खुलाश्यात अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावरुन विहीत मुदतीच्या आत उपलब्ध असलेली माहिती कलम २(च) प्रमाणे प्रदान केली आहे. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०२२ रोजी सदरची माहिती सही व शिक्का मारुन पुनश्चः देण्यात आली आहे. तसेच गोबरवाही वितरण केंद्र-१ व गोबरवाही वितरण केंद्र-२ अशा दोन्ही वितरण केंद्राचा विचार करता घरगुती, कमर्शिअल व कृषी मिळून एकूण १४१७२ ग्राहक आहेत या सर्वांची यादी एकत्रितपणे कागदावर देणे सोयीस्कर नसल्यामुळे ही माहिती वा त्यातील मजकूर पाहिजे असल्यास तसा लेखी अर्ज करुन उपविभागीय कार्यालयात स्वतः उपस्थित होऊन संगणकावर असलेल्या यादीचे संबंधित कर्मचाऱ्यासोबत बसून अवलोकन करावे. व पाहिजे असलेल्या नेमक्या माहितीची प्रिंटआऊट कर्मचाऱ्याकडून काढून घेवून आपणास प्रमाणित करुन देता येईल, असेही अपिलार्थीस कळविले आहे. प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर देण्यात आलेला प्रतिसाद हा माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत असून अपिलार्थी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे ही प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशोत्तर कार्यवाहीमध्ये आढळून येते. ही बाब लक्षात घेता प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २४.०४.२०२४**

जावक क्रमांक 6463 दिनांक 04 SEP 2024